# शिक्षक भारती बैठक दि.०५/१०/२०१६ इतिवृत्त

| अ.क्र. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | शिक्षक भरतीला त्वरित परवानगी देण्यात यावी व सन २०१२ नंतर रिक्त पदावर भरती केलेल्या शिक्षकांना त्वरित मान्यता देण्यात यावी. | सदरचा प्रश्न धोरणात्मक व शासन स्तरावरील असल्याने संघटनेने निवेदन दिल्यास ते वरिष्ठ स्तरावर सादर करण्यात येईल. | संघटना स्तरावर | --- |
| २. | माहे जून, २०१२ नंतर वाढीव तुकडीवर नियुक्त केलेल्या विनाअनुदानित शिक्षकांच्या मान्यता तात्काळ देण्याबाबत. | प्राप्त व परिपूर्ण प्रस्तावांवर मान्यता देण्यात आलेल्या आहेत. | --- | --- |
| ३. | दरवर्षी शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना फंडाच्या स्लिपा मिळाव्यात. | वेतन पथक यांनी त्यांच्या स्तरावर सर्व लेखे पूर्ण करून मुदतीत भ.नि.नि. स्लिपांचे वितरण शाळांना करणे आवश्यक आहे. तसेच ना-परतावा प्रकरणे विहित कालमर्यादेत निर्गत करावीत. विविध शैक्षणिक संघटनांकडून हा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात असल्याने शिक्षणाधिकारी यांनी वेतन पथकास आवश्यक त्या सूचना देवून कामकाज पूर्ण करावे. सध्या प्रलंबित असलेल्या सर्व भ.नि.नि. स्लिपांचे वितरण माहे डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण होईल, याची सर्व जिल्ह्यांनी दक्षता घ्यावी. शैक्षणिक संघटनांकडून पुढील बैठकीवेळी हा प्रश्न उपस्थित होणार नाही, याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. याविषयी केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास लेखी अवगत करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | माहे डिसेंबर, २०१६ अखेर |
| ४. | ज्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ज्या त्या जिल्ह्यात झालेले नाही, अशा शिक्षकांना त्याच शाळेत अथवा त्याच जिल्ह्यात समायोजन करावे. | ज्या त्या जिल्ह्यात जागा रिक्त असल्यास समायोजन केले जाईल. जागा रिक्त नसल्यास विभागीय स्तरावर समायोजन करण्यात येईल. सध्या जिल्हास्तरावर समायोजनाची कार्यवाही सुरू आहे. अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन होईपर्यंत मूळ शाळेतून वेतन अदा करावे. मागणीबाबत संघटनेने निवेदन द्यावे. | शिक्षणाधिकारी / संघटना स्तरावर | --- |
| ५. | सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी ऑनलाईन सेवानिवृत्ती, पेन्शन पेपर पी.एफ.ची कार्यप्रणाली तात्काळ सुरू करावी. | याबाबत संघटनेने निवेदन दिल्यास ते वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल. तसेच हा विषय राज्यस्तरीय बैठकीत घेण्यात येईल. | संघटना स्तरावर | --- |
| ६. | सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी तात्काळ करावी. | धोरणात्मक प्रश्न. याबाबत संघटनेने निवेदन दिल्यास ते वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल. | संघटना स्तरावर | --- |
| ७. | निवडश्रेणी देताना २० टक्केची अट रद्द करून २४ वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना निवडश्रेणीचा लाभ देण्यात यावा. | धोरणात्मक प्रश्न. याबाबत संघटनेने निवेदन दिल्यास ते वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल. | संघटना स्तरावर | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | माध्यमिक शिक्षकांना पदवीधर वेतन देण्यास मान्यता देण्यात यावी. | धोरणात्मक प्रश्न. याबाबत संघटनेने निवेदन दिल्यास ते वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल. | संघटना स्तरावर | --- |
| ९. | वैयक्तिक प्रकरणे (श्री.भिकाजी मारूती कांबळे, सिद्धनेर्ली पर्यवेक्षक मान्यता सन २०१०, मुख्याध्यापक वेतन निश्चिती व जयशिवराय हाय. क।। ठाणे मुख्याध्यापक मान्यता) | शिक्षणाधिकारी यांनी वैयक्तिक प्रकरणे तात्काळ निर्गत करावीत. संघटना स्तरावरून वारंवार विचारले जाणारे वैयक्तिक प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे. बैठकीत चर्चा झालेनुसार वैयक्तिक प्रकरणांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. तेच तेच वैयक्तिक प्रश्न बैठकीत विचारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |

शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग कोल्हापूर